


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे अंक : ८०३ वा शनिवार दि. १५ जून २०२४ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# अजितदादांना धक्का, शिंदेसेनेला वाटा विधानसभेसाठी भाजपचा प्लान ठरला? फडणवीसांनी गणित मांडलं

वृत्तसंस्था/मुंबई

लोकसभा निवडणुकीत महायुतीला राज्यात धक्का बसला. केंद्र आणि राज्यातील सत्तेचं पाठबळ असूनही महायुतीची घसरगुंडी उडाली. मिशन ४५ हाती घेणाऱ्या महायुतीला केवळ १७ जागा मिळाल्या. तर विरोधकांच्या महाविकास आघाडीनं ३० जागा खिशात घातल्या. या पराभवाचं चिंतन करण्यासाठी महायुतीमधील मोठा भाऊ असलेल्या भारतीय जनता पक्षानं काल मुंबईत बैठक घेतली. त्यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पदाधिकाऱ्यांना संबोधित केलं.विधानसभा निवडणुकीच्या तयारीच्या दृष्टीनं आयोजित करण्यात आलेल्या बैठकीतील घडामोडी पाहता महायुतीत लवकरच मोठी उलथापालथ घडण्याचे संकेत मिळत आहे. भाजप अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची साथ सोडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेसोबत विधानसभेची निवडणूक लढवण्याची दाट शक्यता आहे. राज्यात १५७ जागा जिंकण्याचं भाजपचं लक्ष्य आहे. त्यामागचं गणित फडणवीसांनी भाजप कार्यालयात नेते, पदाधिकाऱ्यांशी संवाद साधताना मांडलं.राज्यात ऑक्टोबरमध्ये विधानसभेची निवडणूक होईल. भाजपमधील सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, देवेंद्र फडणवीसांनी लोकसभा निवडणुकीतील कामगिरीची आकडेवारी बैठकीत दिली. लोकसभा निवडणुकीत पक्षानं विधानसभेच्या १२५ जागांवर आघाडी घेतली. तर २५ पेक्षा अधिक मतदारसंघांमध्ये आपण अतिशय कमी मतांनी पिछाडीवर राहिलो. योग्य रणनीती आखून आपण मार्गक्रमण केल्यास विधानसभेच्या १५७ जागांवर आपण सहज जिंकू शकतो, असं गणित फडणवीसांनी मांडलं. राज्यात विधानसभेच्या एकूण २८८ जागा आहेत.फडणवीसांनी मांडलेली आकडेवारी पाहता गेल्या निवडणुकीत १०५ जागा जिंकणारा भाजप यंदा १५० पेक्षा अधिक लढवण्याच्या तयारीत असल्याचं दिसतं. लोकसभा निवडणुकीची कामगिरी पाहिल्यास शिंदेसेनेनं १५ जागा लढवून ७ जागा जिंकल्या. भाजपनं २८ जागा लढवत केवळ ९ जागांवर यश मिळवलं. तर ४ जागा लढवणाऱ्या राष्ट्रवादीला अवघी १ जागा मिळाली. राष्ट्रवादीची कामगिरी समाधानकारक नाही. शिंदेसेनेचा स्ट्राईक रेट भाजपपेक्षा चांगला आहे. त्यामुळे भाजप शिंदेसेनेसोबतची युती कायम राखून दादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची साथ सोडू शकतो.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचं मुखपत्र



असलेल्या ऑर्गनायझरनं भाजप, राष्ट्रवादीच्या युतीवर टीका केली. राज्यात स्थिर असताना राष्ट्रवादीसोबत युती करण्याची काय गरज होती, असा सवाल उपस्थित करण्यात आला. विशेष म्हणजे संघाकडून टीका होत असताना भाजपच्या एकाही बड्या नेत्यानं ठोस भूमिका घेतली नाही. अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज भरत असताना भाजप, सेनेचा एकही नेता हजर नव्हता. त्यामुळे भाजपनं राष्ट्रवादीची साथ सोडण्याची तयारी सुरु केल्याची चर्चा आहे. भाजपचे नेते राष्ट्रवादीपासून अंतर राखू लागले आहेत

## शेतकरी बांधवांनो पुरेसा पाऊस झाल्याशिवाय पेरणीला घाई करू नका कृषी अधिकारी यांचे आव्हान

### जिल्ह्यात ७ लाख ३५ हजार हेक्टर क्षेत्रावर खरीप पिकाच्या पेरणीचे नियोजन

जनसंचलन/बुलढाणा

मान्सूनच्या आगमनामुळे शेतकरी शेतीच्या तयारीला लागला आहे लवकरच पेरणी सुरू करण्याच्या तयारीत आहे शेतकऱ्यांनी पुरेसा पाऊस झाल्याशिवाय पेरणीसाठी घाई करू नये असे आव्हान जिल्हा कृषी अधिकारी ढगे साहेब यांनी केले आहे. आपल्या प्रत्येक भागात १०० मिलिमीटर पाऊस झाल्याशिवाय शेतकऱ्यांनी पे-रणी करू नये सध्या जिल्ह्यात जूनच्या सरासरीत ५० टक्के पाऊस झालेला आहे. १०० मिलिमीटर पाऊस झाल्यास जमिनीमध्ये ओलावा तयार होणार ज्यामुळे बीज अंकुरण्यासाठी मदत होईल त्यासाठी शेतकरी बांधवांना पेरणीसाठी घाई करू नका पुरेसा पाऊस झाला की पेरणीला सुरवात करा असे जिल्हा कृषी अधिकारी यांनी सांगितले आहे. बुलढाणा जिल्ह्यामध्ये ७ लाख ३५ हजार हेक्टर इतक्या क्षेत्रावर खरीप पिकाच्या पेरणीचे नियोजन केले आहे. यामध्ये प्रमुख पिके हे कापूस सोयाबीन आणि तूर हे आहे. सोयाबीनचे चार लाख हेक्टर क्षेत्र, कापसाचे १ लाख ९८ हजार हेक्टर क्षेत्र, व तुर ८५ हजार हेक्टर क्षेत्रावर पेरणीचे नियोजन आहे. या पेरणी साठी लागणारे बियाणे व खत पुरवठा हा जिल्ह्यात पुरेसा आहे. शेतकऱ्यांनी कुठल्याही एका विशिष्ट खताची मागणी न करता बाजारात असलेले सर्वच बियाणे व खते दर्जेदार आहे. सर्वच प्रकारचे बियाणे खते व



आधुनिक हे वापरणे आवश्यक आहे. आज रोजी जिल्ह्यामध्ये काही ठराविक भागात कापसाची पेरणी ही ज्या ठिकाणी संरक्षण सिंचनाची सोय आहे अशा भागामध्ये कापसाची पेरणी केलेली आहे. १०० मिलिमीटर पेक्षा जास्त पाऊस झालेले चार तालुके आहे त्या भागात सोयाबीनची पेरणी झालेली आहे.

## गळफास घेऊन २९ वर्षीय तरुणाची आत्महत्या

जनसंचलन/ खामगाव

चांदमारी येथील एका २९ वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना गुरुवारी रात्री ११:३० वाजता उघडकीस आली आहे. याप्रकरणी खामगाव शहर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली. कपिल प्रकाश गवई, असे मृत युवकाचे नाव आहे. त्याने राहत्या घर-ातील अँगलला साडीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. काही वेळाने हा प्रकार निदर्शनास आला. त्यानंतर या घटनेची



माहिती नातेवाइकांनी पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला. याप्रकरणी शहर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# १४ जून जागतिक रक्तदाता दिवस एकनिष्ठा कडून साजरा

**जनसंचलन/ खामगाव**

रक्तसेवेत सदा अग्रेसर असलेल्या एकनिष्ठा रक्तदाता फाउंडेशन कडून १४ जून जागतिक रक्तदाता साजरा करण्यात आला. रक्तदान सुरक्षित रक्त आणि रक्त घटकांच्या गरजेबद्दल जागरूकता करण्यासाठी दरवर्षी १४ जून रोजी जागतिक रक्तदाता दिवस साजरा केला जातो. हा दिवस स्वेच्छेने आणि कोणतेही पैसे न घेता रक्तदान करणाऱ्या रक्त दात्यांच्या योगदानाचा आम्ही एकनिष्ठा रक्तदाता फाउंडेशन तर्फे सन्मान करतो. रक्त आणि रक्ताशी संबंधित उत्पादने अनेक जीव वाचवितात अशी माहिती एकनिष्ठा फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष सुरजभैय्या यादव यांनी रक्तदात्यांना दिली जागतिक रक्तदाता दिवसाचे औचित्य साधून एकनिष्ठा रक्तदाता फाउंडेशन तर्फे खामगांव, अकोला, बुलढाणा, मलकापूर, नांदुरा, शेगांव येथील गरजु रुग्णांना शासकीय रक्तपेढी व तसेच खासगी रक्तपेढी मध्ये निशु:ल्क रक्तदान एकनिष्ठा रक्तदाता फाउंडेशन तर्फे रक्तनायक अमित शेळके, सुरेश हुंबर्डे, सुमित घाटोळ, रोहन मासूतकर, भुषण पन्हाळकर, विजय कोंडे, राहुल पाटील, पंकज इंगळे, युवराज भेरडे, आनंद इंगळे, दर्शन तिवारी, राहुल मिश्रा, गजानन फुसे, उमेश चव्हाण, महेश सिमरे, पवन शर्मा, दिनेश गुजराथी, विवेक चोपडे, परमेश्वर पवार, अभिजीत पवार, चक्रधर दामोदर, वैभव कापडे, अमोल बोराडे, यश नवथे, नंदकिशोर कोकाटे, आदेश कोळसे, आशिष मेतकर, विजय धांडे, निखिल हजारे, प्रशिक वानखडे, विकास लांडे, गणेश धनोरकार, योगेश इंगळे, विशाल टापरे, राजेश खारवे, डॉ. गोपाल अल्हाट, गोपाल इटीवाले, राहुल वानखडे आशिष अहिर, कार्तिक अंबुसकर, किशोर इंगळे, जॉनी मिरचंदानी आदि रक्तदात्यांनी सामान्य रुग्णालय खामगांव येथे रक्ताचा




तुटवडा असल्याने गरजु रुग्णांना मागील आठवड्या पासून आज दिनांक १४ जून जागतिक रक्तदाता दिवसाचे औचित्य साधून गरजु रुग्णांना वेळोवेळी रक्तदान करून त्यांचा जीव वाचवून दिले नवीन जिवनदान या रक्तसेवेसाठी सुरजभैय्या यादव, ज्ञानेश सेवक (सर), दिपक खैरे, मोहन शर्मा, जितेंद्र मच्छरे, प्रदीप शमी, रवि दिपके, गणेश मनसुटे, शिवा वनारे, आकाश खंडारे, पंकज अंबारे एकनिष्ठा फाउंडेशनच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# समृद्धी महामार्गावर हिवरखेड पूर्णा शिवारात बॅरीयर चोरी करण्याचा प्रयत्न

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

समृद्धी महामार्ग चैनल नंबर ३२३ जवळील हिवरखेड पूर्णा शिवारात साईड बॅरियर चोरी करण्याचा प्रयत्न करण्याच्या तयारीत असताना पोलीसांची गसतीची गाडी पाहून चोरटे पसार झाले असून घटनास्थळावरून एक मोटारसायकल व बॅरीयर कापण्याचे साहीत्य जप्त करण्यात आले आहे

दिनांक १३/ ६/ २४ रोजी रात्री १०.३० वा दरम्यान महामार्ग पोलीस चे पीएसआय गजानन उज्जैनकर पोलीस हेडकॉन्स्टेबल गणेश सुसर ,गोपाल गोरले, महाराष्ट्र सुरक्षा बल चे गणेश बुलबुले सणांनसे हे समृद्धी महामार्गावर मा. पोलीस अधीक्षक साहेब महामार्ग नागपूर यांच्या आदेशाने रात्रगस्त पेट्रोलिंग करीत असताना संभाजीनगर कंट्रोल रूम येथून माहिती मिळाली की चायनैज नंबर ३२३ जवळ दोन-तीन इसम संशयतरीत्या उभे आहे वरून तात्काळ घटनास्थळी पोलीस पथक दाखल झाले असता तीन ते चार इसम पोलिसांची गाडी पाहून व अंधाराचा फायदा घेऊन पळून गेले व घटनास्थळी बॅरियर चे नट बोल्ट व लोखंडी करवत, पाना ,टामी, छन्नी हातोडा इत्यादी चोरी करण्याचे साहित्य हे जागेवर मिळून आले व महामार्गाच्या साईड बॅरिअरच्या बाहेर एक मोटारसायकल बजाज पल्सर क्रमांक- एम एच -२८- बी व्ही ०५३४ बेवारस मिळून आली. सदर ठिकाणी समृद्धी महामार्ग प्रोजेक्ट मॅनेजर अरुण चौधरी, व सेफ्टी इन्चार्ज शिवम शर्मा यांनी घटना स्थळ गाठून संबंधित पोलीस स्टेशन किनगाव राजा माहिती देऊन तात्काळ पोलीस स्टेशनचे पोलीस हेडकॉन्स्टेबल गणेश डोईफोडे व पंढरी डोईफोडे यांनी तात्काळ घटनास्थळी येऊन संबंधित घटनेची पाहणी करून बेवारस मोटारसायकल पोलीस स्टेशन किनगाव राजा येथे पुढील तपास कमी घेऊन गेले व तपास करीत आहे. महामार्ग पोलीस पथक व महाराष्ट्र सुरक्षा बल चे जवान रोज महामार्गावर रात्रगस्त करीत असतात जर पोलीस वेळेत घटनास्थळी पोहोचले नसते तर संबंधित चोरटे हे चोरी करून पसार झाले असते.

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमातून रोजगाराची संधी

**जनसंचलन/बुलढाणा**

ग्रामीण आणि शहरी भागातील सुशिक्षीत बेरोजगार युवांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम राबविण्यात येत आहे. इच्छुक युवकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

ग्रामीण आणि शहरी भागातील सुशिक्षित बेरोजगार युवक, युवतींची वाढती संख्या व उद्योग व्यवसाय क्षेत्रात उपलब्ध होत असलेल्या स्वयंरोजगार व रोजगाराच्या विविध संधी विचारात घेऊन उद्योजकतेला चालना देणारी व सर्जनशिलतेला कालानुरूप वाव देणारा सर्वसमावेश कार्यक्रम मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाच्या माध्यमातून सुरु केला आहे. सन २०२३-२४ साठी जिल्हा उद्योग केंद्रास एकूण १ हजार ३०० युवक, युवतींना वित्तीय संस्थांच्या माध्यमातून लाभ देण्याचे लक्षांक आहे. या योजनेतून मोठ्या प्रमाणात रोजागर निर्मिती होणार असल्याने मुदतीत लक्षांक पूर्ण करण्यासाठी प्राधान्य देण्यात येत आहे.

या योजनेतून लाभ घेण्यासाठी कुठलेही स्थायी उत्पन्न नसलेले स्थानिक रहिवासी ज्यांचे वय १८ वर्षे पूर्ण अधिकतम मर्यादा ४५ वर्षे असून अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, दिव्यांग, माजी सैनिकांना पाच वर्षे शिथील आहे. शैक्षणिक पात्रता ही १० लाखावरील प्रकल्पासाठी सातवी पास, तसेच २५ लाखावरील प्रकल्पासाठी दहावी पास आहे. या योजनेत सेवा उद्योग, तसेच कृषी पुरक उद्योग, व्यवसायासाठी २० लाख, तसेच उत्पादन प्रकारच्या प्रवर्गातील प्रकल्पांसाठी ५० लाखापर्यंत कर्ज सुविधा उपलब्ध आहे. एकूण प्रकल्प किंमतीच्या शहरी भागासाठी १५ ते २५ टक्के आणि ग्रामीण भागासाठी २५ ते ३५ टक्यांपर्यंत अनुदान उपलब्ध होणार आहे. ही योजना ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. उद्योग व्यवसाय उभारणीसाठी -.. या संकेतस्थळावर भेट देवून अर्ज दाखल करावा, जिल्ह्यातील प्रत्येक गाव, शहरातील सुशिक्षित बेरोजगार युवक, युवतींनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद लांडे यांनी केले आहे.

# किमान कौशल्य विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी प्रभावीपणे करा- जिल्हाधिकारी सौरभ करियार

**वृत्तसंस्था/अमरावती**

प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत किमान कौशल्य विकास कार्यक्रम या जिल्हास्तरीय योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करावी. दरवर्षी निश्चित करण्यात आलेले प्रशिक्षण विहित कालावधीत पूर्ण करुन उमेदवारांना रोजगाराच्या नवीन संधीची कवाडे खुली करून देण्यास सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी आज येथे दिले .

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या महसूल भवन येथे आज कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारी समितीची सभा संपन्न झाली. समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी श्री. कटियार यावेळी बोलत होते. सहायक जिल्हाधिकारी अमर राऊत, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे उपायुक्त डी. एल. ठाकरे, सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर, कारागृह अधीक्षक कीर्ती चिंतामणी, उद्योग विभागाचे प्रतिनिधी मयूर झवर, जिल्हा कौशल्य विकास समन्वयक वैभव टेटू आदी यावेळी उपस्थित होते.

जिल्ह्यातील युवक युवतींचे कौशल्य विकासाव्दारे सक्षमीकरण करुन त्यांना अधिकाधिक मागणी असलेल्या उद्योग, सेवा व तत्सम क्षेत्रात रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान राबविण्यात येते. या अभियानांतर्गत नियमितपणे प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात यावा. या प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये पर्यटन, आदरतिथ्य,जीएसटी असिस्टंट, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, सोशल मीडिया आदी प्रशिक्षणाचा अंतर्भाव करावा. सद्यस्थितीत उद्योग विभागाला आवश्यक असणाऱ्या मागणीप्रमाणे प्रशिक्षण कार्यक्रम राबवावा. विद्यार्थी तसेच पालकांचे मत जाणून घेऊन त्यांना आवश्यक असलेल्या प्रशिक्षणावर भर द्यावा, अशा सूचना श्री. कटियार यांनी यावेळी दिल्या.

जिल्ह्यातील विशिष्ट भौगोलिक तथा सामाजिक स्थिती, परंपरागत व्यवसाय, नैसर्गिक संसाधने, साधनसामुग्री इत्यादींच्या आधारे जिल्ह्यातील रोजगार-स्वयंरोजगारासाठी अधिक मागणी असलेली क्षेत्रे निश्चित करून त्या क्षेत्रातील कौशल्याच्या मागणीनुसार विशिष्ट अभ्यासक्रम राबवावेत. त्याचप्रमाणे अमरावती कारागृहातील बंदींना कौशल्य प्रशिक्षण देण्यात आल्यास ते पुन्हा गुन्हेगारीकडे वळणार नाहीत. तसेच या प्रशिक्षणामुळे ते रोजगारक्षम होऊन सन्मानाने जीवन जगू शकतील. यादृष्टीने बंदींना रोजगारक्षम बनविण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण देण्यात यावे, असे श्री. कटियार यावेळी म्हणाले.

बैठकीच्या सुरुवातीला सहायक आयुक्त श्रीमती बारस्कर यांनी सादरीकरणाद्वारे प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत माहिती दिली. जिल्ह्यात सद्यस्थितीत ३०० उमेदवारांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. बैठकीमध्ये सन २०२४-२५ च्या जिल्हा कौशल्य विकास आराखड्यास मान्यता देण्यात आली. प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र, आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र, कारागृहातील बंदींसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम, आकांक्षा-कौशल्यातून जीवनोन्नतीकडे कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम याबाबत यावेळी आढावा घेण्यात आला. युवक-युवतींचे कौशल्य विकासाद्वारे सक्षमीकरण करून त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्ह्यात लवकरच ङ्गनमो महारोजगार मेळाव्याफ्चे आयोजन करण्यात येणार आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# रायपूर परिसरात डेंग्यूचे रुग्ण वाढले

**जनसंचलन/ रायपूर**

तालुक्यातील रायपूर प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत रायपूर येथील गावामध्ये गेल्या एक महिन्यापासून डेंगूसदृश्य तापाची साथ जोमात चालू असून याकडे ग्रामपंचायत व आरोग्य विभागाचे दुर्लक्ष होतांना दिसून येत आहे रायपूर प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत पिंपळगाव सराई पांगरी नांद्रा कोळी केसापूर सैलानी भडगाव रुईखेड या गावासह १६ गावांचा समावेश आहे तसेच रायपूर प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत सहा उपकेंद्र समावेश आहे यामध्ये पिंपळगाव सराई उपकेंद्रावर दोन आरोग्य सेवकांच्या जागा बऱ्याच दिवसापासून रिक्त आहे तसेच रायपूर येथे सुद्धा दोन आरोग्य सेवकांच्या जागा रिक्त आहे व रायपूर प्राथमिक आरोग्य केंद्रातील औषधी निर्माता हे पद गेल्या एक वर्षापासून रिक्त आहे रायपुर प्राथमिक आरोग्य केंद्राला गेल्या एक वर्षापासून कनिष्ठ लिपिक नसल्यामुळे आरोग्य केंद्राचा कारभार ढासळलेला आहे रायपूर प्राथमिक आरोग्य केंद्रात एकूण ४० कर्मचारी आहे त्यापैकी सहा जागा रिक्त आहे तसेच काही कर्मचारी फक्त प्राथमिक आरोग्य केंद्राला हजेरी लावून सही करून निघून जातात त्यामुळे या परिसरातील आरोग्यसेवा कोलमाडली आहे रायपूर गावामध्ये एका महिन्यामध्ये जवळपास डेंगू चे जवळपास ३० रुग्ण आढळले असून हे रुग्ण खाजगी दवाखान्यामध्ये उपचार घेत आहे याप्रकरणी बुलढाणा तालुका



आरोग्य अधिकारी महेंद्र सरपाते यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की रिक्त पदे भरण्यासाठी वरिष्ठांकडे मागणी केली आहे तसेच रायपूर प्राथमिक आरोग्य केंद्र मध्ये गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यावर कारवाई करण्यासाठी वरिष्ठांकडे अहवाल दिलेला आहे तसेच तसेच रायपूर प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी शेख उस्मान यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की रायपुर गावामध्ये डेंगूसदृश्य तापेचे रुग्ण असल्याची त्यांनी कबुली दिली डेंगूची सात कमी होण्यासाठी रायपूर ग्रामपंचायतला नाल्यांची साफसफाई तसेच पाणी शुद्धीकरणासाठी पत्र दिले असल्याचे त्यांनी सांगितले तसेच रायपूर गावामध्ये डेंग्यूच्या सात विषयी सर्वेक्षण करण्यासाठी दहा टीम द्वारे कंटेनर सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू झाले असून प्रत्येक गावामध्ये रोगराई वाढण्याची शक्यता आहे तरी आरोग्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रायपूर प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी रिक्त असलेल्या जागांची त्वरीत नेमणूक करावी अशी मागणी रायपूर येथील सरपंच व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांनी केलेली आहे.

# पूजा शिक्षण प्रशिक्षण संस्था येथे प्रवेश देणे सुरू...

**जनसंचलन/खामगाव**

महाराष्ट्र शासनाच्या अधिनस्त असलेल्या महाराष्ट्र राज्य कौशल्य शिक्षण व प्रशिक्षण मंडळ ,मुंबई. यांना सलग्नित पूजा शिक्षण प्रशिक्षण संस्था ,खामगाव. या संस्थेमध्ये स्वयं अर्थ साह्य तत्त्वावर मान्यता असलेल्या ,सिविल गटातील बांधकाम पर्यवेक्षक प्रमाणपत्र अभ्यासक्रम हा कोर्स यशस्वीरित्या सुरू असून शेकडो विद्यार्थी शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग ,जिल्हा परिषद बांधकाम विभाग , पंतप्रधान ग्रामसडक योजना तसेच जलसंधारण विभाग इत्यादी ठिकाणी असिस्टंट इंजिनिअर स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक म्हणून रुजू झालेले आहेत. त्यापैकी बऱ्याच विद्यार्थ्यांचे इंजिनियर पदावर प्रमोशन झालेले आहेत. काही विद्यार्थी या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून गव्हर्मेंटची लायसन प्राप्त झाल्यामुळे यशस्वी गव्हर्मेंट ठेकेदारीचा व्यवसाय करत आहेत. काही विद्यार्थी नियमित उपस्थित राहून सिविल विभागाचे कौशल्य प्राप्त केल्यामुळे बांधकाम ठेकेदार म्हणून यशस्वीपणे कन्स्ट्रक्शन कामात ठसा उमटवित आहे. तर काही विद्यार्थी हाऊस कन्स्ट्रक्शन फर्म ,रोड कन्स्ट्रक्शन कंपनीमध्ये ,कन्स्ट्रक्शन सुपरवायझर म्हणून नोकरी करत आहे .


तर २०२२ पासून इच्छुक मुली व अडचणीत असलेल्या महिलांना रोजगार प्राप्त करून देण्यासाठी पॅरामेडिकल गटातील नर्सिंग केअर हा एक वर्षीय अभ्यासक्रम संस्थेने सुरू केला आहे. सदर दोन्ही अभ्यासक्रमासाठी संस्थेला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे .शासनाच्या कौशल्यावर आधारित सदर अभ्यासक्रमाला प्रवेशित विद्यार्थी नियमित क्लास करतात, संस्थेच्या वतीने उत्कृष्ट प्रशिक्षण राबविण्यात येत आहे . अभ्यासक्रमाशी निगडित असलेले संपूर्ण प्रॅक्टिकल, विविध प्रोजेक्ट ,शैक्षणिक सहली, शैक्षणिक उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वर्षभर कार्यरत ठेवल्या जाते. वर्ष कसे निघून जाते ,विद्यार्थ्यांना ठाम पत्ता लागत नाही .लोकसंख्या वाढत आहे. दरवर्षी हजारो नवीन घरे बनतात .त्यासाठी रोड बनतात . कन्स्ट्रक्शन व सुपर विजन करण्यासाठी या बांधकाम अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना इंजिनीयर म्हणून प्रचंड मागणी आहे. तर पॅरामेडिकल गटातील नर्सिंग या अभ्यासक्रमातील प्रशिक्षणार्थ्यांना वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात नवनवीन हॉस्पिटल उघडत असून त्यामध्ये नर्सिंग केअर या पदाला सुद्धा प्रचंड मागणी आहे.

मी विद्यार्थ्यांना आवाहन करतो की ज्यांना दहावी बारावीला आपल्या बौद्धिक क्षमतेनुसार द्वितीय श्रेणीचे गुण मिळाले आहे किंवा जे विद्यार्थी बारावी परीक्षेत उत्तीर्ण झाले नाही जे विद्यार्थी पारंपारिक एज्युकेशन घेऊन नोकरी मिळत नाही म्हणून डिप्रेशन मध्ये जाण्याच्या स्थितीत असतील, अशा विद्यार्थ्यांनी व पालकांनी संस्थेला एकदा भेट द्यावी व आपल्या पाल्याचे भविष्य यशस्वीपणे घडविण्यासाठी संस्था किती प्रयत्न करू शकते हे बघून प्रवेश घेण्यास काही हरकत नाही.

# पिरॅमिड स्पिरीच्युअल सोसायटी मुव्हमेंट आणि मॉडेल डिग्री कॉलेज बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षकासाठी १५ जुनला ध्यान शिबिराचे आयोजन

**जनसंचलन/बुलढाणा**

पिरॅमिड स्पिरीच्युअल सोसायटी मुव्हमेंट , कल्पवृक्ष पिरॅमिड ध्यान केंद्र बुलढाणा,इंडियन रेडक्रॉस सोसायटी बुलढाणा आणि मॉडेल डिग्री कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने ध्यान शिबाराचे आयोजन करण्यात आलेले आहे.या शिबिरा करीता विषाखापट्टनम येथील सिनियर पिरॅमिड मास्टर पी.व्ही. रामाराजू हे येणार आहेत. या शिबिराच्या माध्यमातून शारीरीक स्वास्थ,. मानसिक स्वास्थ ,आर्थिक परीपक्वता ,अध्यात्मीक उत्थान, सामाजिक संबध मध्ये सुधारणा,बुद्धीचा विकास,सकारात्मकता,कार्यक्षमता ,आर्थिक क्षमता,आत्मज्ञान वाढविणे, तसेच ताणतणाव व्यवस्थापना बरोबर आपल्या जीवनाचा खरा अर्थ समजून स्वत:वर प्रेम करायला शिकविले जाणार आहे. सदरहू ध्यान शिबीर बुलढाणा येथील राष्ट्रवादी भवन बुलढाणा अर्बन रेसिडेन्सी जवळ येथे सकाळी १० ते २ यावेळेत होणार आहे. हे ध्यान शिबीर निशुल्क असुन ध्यान शिबिराचा लाभ शिक्षक त्यांच्या



कुटुंबीयांनी आणि जनतेन घ्याव असे आव्हान कल्पवृक्ष पिरॅमिड ध्यान केंद्र बुलढाणा,इंडियन रेडक्रॉस सोसायटी बुलढाणा आणि मॉडेल डिग्री कॉलेज यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचा जिल्हा दौरा



**जनसंचलन/बुलढाणा**

केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या दौऱ्यानुसार दि. १४ जून २०२४ रोजी रात्री ११.३० वाजता मेहकर येथील निवासस्थानी आगमन होईल. त्यानंतर शनिवार, दि. १५ जून आणि रविवार, दि. १६ जून आणि सोमवार, दि. १७ जून रोजी बुलढाणा जिल्ह्यातील विविध स्थानिक कार्यक्रमांना उपस्थित राहतील. त्यानंतर सोमवारी सायंकाळी ६.३० वाजता मेहकर येथून औरंगाबाद मार्गे दिल्लीला प्रयाण करतील.

# बुलडाणा, चिखली, मेहकर येथे छत्रपती शाहू महाराज युवा शक्ती करीयर शिबीर

**जनसंचलन/बुलडाणा**

कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नविन्यता विभाग, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबईच्या वतीने बुलडाणा, चिखली, मेहकर येथे छत्रपती शाहू महाराज युवा शक्ती करीयर शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. चिखली येथे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत बुधवार, दि. १९ जून रोजी सकाळी १० वाजता शिबीर घेण्यात येणार आहे. आमदार श्वेता महाले उद्घाटक म्हणून उपस्थित राहणार आहेत. यात डॉ. शिवाजी पाटील, डॉ. अनंत सिरसाठ, सचिन वारूळकर, नितीन चौधरी, उपप्राचार्य प्रविण खांडवे मार्गदर्शन करणार आहेत. मेहकर येथे कृषि वैभव लॉन मध्ये गुरूवार, दि. २० जून रोजी सकाळी ११ वाजता शिबीर घेण्यात येणार आहे. आमदार संजय रायमुलकर उद्घाटक म्हणून उपस्थित राहणार आहेत. यात उपविभागीय अधिकारी रविंद्र जोगी मार्गदर्शन करणार आहेत. बुलडाणा येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेध्ये गुरूवार, दि. २० जून रोजी सकाळी ९ वाजता शिबीर घेण्यात येणार आहे. आमदार संजय गायकवाड उद्घाटक म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी दहावी, बारावी. डिप्लोमा, डिग्री उत्तीर्ण, अनुत्तीर्ण, सर्व विद्यार्थी व पालकांनी मेळाव्यास उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्यांशी चालला खेळ...

## सीईटी, नीट परीक्षेनंतर आता बुलढाण्यात टायपिंग परीक्षा घोटाळा उघड...

### परीक्षा केंद्र आणि बाहेरून परीक्षा देऊन घोटाळा करणारे विद्यार्थी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार राहुल बोंद्रे यांच्या कॉलेज आणि इन्स्टिट्यूट मध्ये घडला प्रकार

**जनसंचलन/चिखली**

सीईटी आणि नीट परीक्षेत गैरप्रकार समोर आल्यानंतर आता बुलढाण्यात टायपिंग परीक्षेत मोठा घोटाळा झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. चिखली शहरातील अनुराधा अभियांत्रिकी महाविद्यालयात काल महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने टायपिंग परीक्षा घेण्यात आली. यामध्ये अनुराधा अभियांत्रिकी कॉलेजच्या परीक्षा केंद्रावर एकूण २२ विद्यार्थी परीक्षेला बसल्याचे त्यांच्या मॅक आयडीवरून दाखवण्यात आले, मात्र प्रत्यक्षात या ठिकाणी १४ विद्यार्थीच परीक्षा देत असल्याचे समोर आले, त्यामुळे आठ विद्यार्थी हे बाहेरून एका लॅपटॉप वरून परीक्षा दिल्याचं उघड झाल आहे, हा संपूर्ण प्रकार आयटी शिक्षक गजानन लागे यांनी केल्याचं मान्य केल आहे, परीक्षा केंद्र आणि बाहेरून परीक्षा देणारे आठ विद्यार्थी ज्या इन्स्टिट्यूटचे आहेत हे दोन्ही कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार राहुल बोंद्रे यांचं आहे. त्यावरून शिक्षण




विभागामार्फत चिखली पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली असून, संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या घटनेमुळे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली असून यापू- र्वी देखील विद्यार्थ्यांकडून पैसे घेऊन असे प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्यांशी हा खेळ सुरू आहे.त्यामुळे या घटनेकडे गार्भीयाने लक्ष देण्याची गरज आहे.दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी विद्यार्थांकडून मागणी करण्यात येत आहे

---

## दगडाने ठेचून धरणगावात २१ वर्षीय युवकाची हत्या...

### पोलिसांनी संशयित तिघांना ताब्यात घेतले...

**जनसंचलन/मलकापूर**

तालुक्यातील धरणगावात २१ वर्षीय युवकाची दगडाने ठेचून हत्या केल्याची घटना शुक्रवारी सकाळी उघडकीस आली. मृतक हा मोताळा तालुक्यातील डिडोळ्याचा रहिवासी आहे. पोलिसांनी संशयित तिघांना ताब्यात घेतले आहे. अज्ञात आरोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी आरोपींचा शोध घेण्यासाठी श्वान पथक पाचारण करण्यात आले. शुक्रवारी सकाळी ५:३० वाजताच्या सुमारास काही जण शौचास जात असताना गावातील खंडोबा मंदिरानजीक खुल्या सभागृहात त्यांना रक्ताचा सडा दिसून आला. त्यांनी तत्काळ पोलिस पाटलांच्या माध्यमातून शहर पोलिसांना माहिती दिली. सहायक पोलिस निरीक्षक करुणाशील तायडे, पोलिस उपनिरीक्षक राहुल वरारकर आदीं- सह पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांना खंडोबा मंदिरानजीकच्या ओपन सभागृहात रक्ताचा सडा व दक्षिणेस युवकाचा मृतदेह आढळून आला. मृतकाच्या खिशातील मोबाइलवरून संपर्क



करण्यात आल्याने त्याची ओळख पटली. त्यानुसार त्याचे नाव दीपक सुधाकर सोनोने (२१, रा. डिडोळा, ता. मोताळा), असे आहे. या घटनेत मृतकावर दगडाने किंवा काठीने जबर मारहाण करण्यात आल्याचे दिसून आले.त्याचबरोबर मंदिरानजीकच्या सभागृहात उत्तरेकडून दक्षिणेकडे तब्बल ३० फूट मारेकऱ्यांनी मृतदेह फरफटत नेल्याने रक्ताचा सडा पडल्याचे दिसून आले. त्या युवकाची हत्या आपल्या गा- वात कशी? या प्रश्नामुळे धरण- गावात एकच खळबळ उडाली आहे. पोलिसांनी तत्काळ स्थानिक तिघा संशयितांना ताब्यात घेतले आहे. बुलढाणा येथील श्वान पथक घटनास्थळी पाचारण करण्यात आले. पुढील तपास पोलिस करीत आहेत. याप्रकरणी मृतकाचा भाऊ, विजय सुधाकर सोनोने यांनी शहर पोलिसांत फिर्याद दाखल केली. त्यात त्याचा भाऊ दीपक हा गुरुवारी सायंकाळी घरून निघून गेला होता. त्याचा मलकापुरात जगू मामाच्या ढाब्यावर शोध घेतला असता अनोळ- खी व्यक्तीने त्यांना माहिती दिली. त्याअनुषंगाने पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भादंवि कलम ३०२ अन्वये खुनाचा गुन्हा दाखल केला.

## गोठ्यातून चोरट्यांनें गाई चोरून नेली

**जनसंचलन/ खामगाव**

शहरासह ग्रामीण भागात जनावरे चोरीच्या घटना वाढीस लागल्या असून, तालुक्यातील बोथाकाजी येथील शेख राजू शेख आमद यांच्या गोठ्यातून सात हजार रुपये किमतीची गाय चोरीला गेली. खामगाव ग्रामीण पोलिस स्टेशनला तक्रार दिली आहे तपास बाळकृष्ण फुंडकर करीत आहेत.

